International Research Journal ISSN-0975-3486 VOL. I * ISSUE—5 RNI : RAJBIL/2009/30097

शोध पत्र

Feb, 2010

# दहशतवादाचा जागति विळखा

*डॉ. कल्पना कदम बेद

* यशवंत महाविद्यालय, नांदेड

१९९० च्या दशकात आंतरराष्ट्रीय राजकारणात अनेक बदल घडून आले. १९९१ मध्ये रशियाचे विघटन होऊन शीतयुद्ध समाप्त झाले. शीतयुद्धाचा शेवट झालेला असला तरी संघर्षाचे अस्तीत्व कायम आहे. १९९० च्या दशकात आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये विभागीय संघर्षाना महत्त्व प्राप्त झाले आहे. उदा. इराक-कुवेत आक्रमण, रशिया चेचेऱ्या संघर्ष नेपाळमधील नेपाळ सरकार, माओवाद्यांमधील संघर्ष हे या काही प्रमुख संघर्ष असुन याला आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्व प्राप्त झाले आहे. तसेच दुसऱ्या बाजुला अव्वस्त्रधारी राष्ट्रांची संख्या वाढत आहे यामुळे काही संघर्षाचे रुपांतर अवस्त्र युद्धात होण्याची शक्यता वाढली. याच अनुषंगाने आंतरराष्ट्रीय दहशतवाद गंभीर समस्या महत्त्वाची घडामोड होय. आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये राज्यक या प्रकारात आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांच्या आभ्यासाला महत्त्व आले. आंतरराष्ट्रीय दहशतवाद हा परराष्ट्र धोरणास प्रभावित करणारा घटक असून त्याचा सामना हा जागतिक शांततेला आव्हान ठरले आहे. जागतिक राजकारणात २० व्या शतकात दहशतवादाच्या विस्तारास प्रारंभ झाला, खरेतर दहशतवाद हा मानवी समस्येइतकाच जुना आहे. प्राचीन काळापासून कोणत्या ना कोणत्या स्वरुपात, दहशतवादाचे अस्तित्व आढळते. इजिप्शियन व ॲसेरियन संस्कृतीमध्ये दहशतवादाची बीजे आढळतात. मध्ययुगात नादिरशहा व तैमुरलंग हेही एक प्रकारचे दहशतवादी राज्यकर्ते होते. दुसऱ्या महायुद्धानंतर दहशतवादाचे स्वरुप बदलत गेले. १९६० नंतर अंतर राष्ट्रीय स्तरावर दहशतवादाचा प्रसार वेगाने होत गेला. दहशतवादी टोळ्यांची विध्वंसक व हिंसक कृत्ये वाढत गेली. उदा.इटलीत रेड ब्रिगेड हि दहशतवादी संघटना, अफगाणिस्तानातील अल कायदा, वर्ल्ड इस्लामिक फ्रंट श्रीलंकेतील लिबरेशन टायगर्स ऑफ तामिळ ईलम, इस्त्रायलमध्ये पॅलेस्टाईन लिबरेशन ऑर्गनायझेशन, इराणमधील मुजाहिद्दीन एक खाल्क, लॅबनॉनमधील हिजबुल्लाह, अल्जेरियामधील आर्म्ड इस्लामिक गट, हरकत उत मुजाहिद्दिन यासारख्या दहशतवादी संघटना कार्यरत आहेत.

११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेच्या न्यूयॉर्क शहरी जागतिक व्यापारी केंद्र अर्थात वर्ल्ड ट्रेड सेंटरवर आणि अमेरिकेच्या गुप्तहेर संघटनेचे कार्यालय असलेल्या पेंटागॉनवर दहशतवाद्यांनी विमान हल्ला केला म्हणजे जगाचा स्वयंभू फौजदार समजत असलेल्या अमेरिकेच्या नाकावर हा हल्ला झाल्यामुळे दहशतवादाविरुद्ध लढण्याची भूमिका अमेरिका आज मांडत आहे. त्यामुळे अमेरिकेने दहशतवादाविरुद्ध दंड थोपटले व हे युद्ध दहशतवादाविरुद्ध असून जगातील सर्व राष्ट्रांनी या युद्धाला पाठींबा द्यावा, असे अमेरिकेने जाहीर केले. यापुर्वी दहशतवाद आशियाई राष्ट्रांचाा प्रश्न म्हणून अमेरिका त्याकडे डोके झाक करीत होती.

अमेरिकेने वेळोवेळी आंतरराष्ट्रीय कायदा, नीतीमुल्ये युनो इत्यादींना धाब्यावर बसवुन बळाचा वापर करुन अनेक देशानेमध्ये अनेक वेळा गावकरी हस्तक्षेप केल्याचे सर्वश्रुत आहे. आखाती प्रदेशातील आपले साम्राज्यवादी हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी अमेरिकेने इस्त्राईल हे शस्त्रसज्ज पोलीस ठणे उभारले आहे. अमेरिकेच्या या सर्व दहशतवादी कारवायांमागे जगावर आपले वर्चस्व प्रस्थापित करणे हा हेतू आहे. आजपर्यंतच्या मानवी इतिहासातील दहशतवादापेक्षा हा दहशतवाद अभूतपुर्व असा आहे कारण दहशतवादाचे स्वरुप, उग्रता व पद्धती सर्वच भयंकर, अमानुष असे आहे म्हणुनच तो जागतिक शांततेला आव्हान ठरला आहे. मानवी संस्कृती, सभ्यता व प्रगतीला नष्ट करणारा हा दहशतवाद आहे. **दहशतवादाचा अर्थ** आत्तापर्यंत दहशतवादाच्या विविध प्रकारे व्याख्या करण्यात आलेल्या आहेत परंतु एका विशिष्ट व्याख्याबाबत एकमत नाही. दहशतवाद म्हणजे राजकीय बदल घडवून आणण्यासाठी जाणीवपुर्वक व पद्धतपणे दहशतीचे वातावरण निर्माण करुन सामाजिक प्रगती आणि राज्यक्रांतीसुद्धा घडवून आणावी असा या सूत्राचा अर्थ होतो.. दहशतवाद म्हणजे हिंसाचार होय. दहशतवाद हा शब्द इंग्रजी "Terrorism' या शब्दाचे रुपांतर आहे. "Terrorism' हा शब्द फ्रेंच "Terroste' या शब्दावरुन घेण्यात आला आहे. या शब्दावरुन घेण्यात आला आहे. या शब्दाला सर्वप्रथम चालना १७९५-९८ या फ्रेंच राज्यक्रांतीच्या

काळात मिळाली. हिंसक मार्गाने आपले उद्दिष्ट पुर्ण करण्यासाठी किंवा आपल्या ध्येयप्राप्तीसाठी व्यक्ती किंवा दहशतवादाचा वापर करतात.

**व्याख्या** १) 'राजकिय उद्दिष्ट साध्य करण्यासाठी समाजात भीती व दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने केलेले हिंसात्मक गुन्हेगारीचे वर्तन म्हणजे दहशतवाद होय.' - **जॉन क्रेटम** २) आपली राजकीय व सामाजिक उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी व्यक्तीविरुद्ध, मालमत्तेविरुद्ध, शासन किंवा त्यावर जबरदस्ती करण्याकरिता अवैध हिंसाराचा अगर बळाचा वापर म्हणजेच दहशतवाद होय. - **अमेरिकन संघराज्याचा गुन्हे अन्वेषण विभाग** ३) 'दहशतवादी कारवायांमध्ये प्रामुख्याने पुढील सहा प्रक्रियांचा समावेश होतो. १) बॉम्बफेक२) मानवहत्या ३) वाहतुकीस अडथळे ४) हवाई चाचेगिरी ५) ओलीस ठेवणे ६) अपहरण यापैकी एक किंवा अधीक मार्गाने दहशत निर्माण केले जाते त्यास दहशतवाद म्हणतात - **दहशतवादी संशोधनाच्या गटानुसार** ५) अमुलाग्र राजकीय व सामाजिक परिवर्तन घडवून आणणाच्या हेतूने शासनावर छाव आणन्यासाठी हिंसाचाराच्या मार्गाचा अवलंब करणे.' - **पेंग्वीने राज्यशस्त्र शब्दकोष** ६) राजकीय बदल घडवून आणण्यासाठी केलेला धाकाचा व बळाचा वापर म्हणजे दहशतवाद होय. - **ब्रायनजेनकिन्स**

.७) राज्यविरुद्ध केलेला अपराध किंवा विशिष्ट व्यक्ती किंवा व्यक्तीसमुह किंवा सर्वसाधारण जनतेच्या मनात हेतुपुरस्पर दहशत निर्माण करण्याच्या दृष्टीने केलेली योजनाबद्ध वृत्ती म्हणजे दहशतवाद होय. - **आंतरराष्ट्रीय परिषद** ८) दहशतवाद हा भीती निर्माण करण्याच्या उद्देशाने व शक्तीचा प्रयोग करुन आपले लक्ष प्राप्त करण्यासाठी आहे. दहशतवाद कोणत्याही समुदायाकडून होऊ शकतो. - **जीस्वार्जन बर्गर** सैन्यझु या चिनी तत्ववेत्याने २५०० वर्षापुर्वी म्हटले आहे की, Kill one, frightened thousand म्हणजे एकाला मारा, हजारोंना घाबरवा. अशा विविध व्याख्याच्या आधारे थोडक्यात असे म्हणता येइल कि दहशतवाद म्हणजे असा हिंसाचार कि त्याची दहशत, भीती, जरब सर्वसामान्य लोकांपर्यंत पोचवली जाते. वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या देशातील राज्यकर्त्यांनी स्वार्थासाठी दहशतवाद पोसला. उदा.सौदी अरेबिया, लेबनॉन, इस्त्राएल, लिबिया, अफगाणिस्तान, इराण, पाकिस्तान, पॅलेस्टाइन इ.

**उद्दिष्ट्ये** -१) प्रस्थापित समाजव्यवस्था किंवा शासनव्यवस्था उलथवुन टाकणे. २) निश्चित राजकीय, सामाजिक, आर्थिक व धार्मिक स्वरुपाचे उद्दिष्ट असते.

**वैशिष्ट्ये** - १) आपला हेतू साध्य करणे (राजकीय, धार्मिक). २) प्रस्थापित व्यवस्थेला बेकायदेशीर मार्गाने विरोध करणे. ३) कामाच्या पद्धतीत गनिमीकाव्याचा वापर करणे. ४) आपल्या उद्दिष्टाबाबत कमालिची गुप्तता राखणे. ५) जैविक व रासायनिक शस्त्रांचा वापर करुन दहशत पसरविणे ६) आपल्या कारवायाकडे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर लक्ष वेधुन घेणे.

**दहशतवादाची कारणे** - दहशतवादापैकी आंतरराष्ट्रीय दहशतवादाची चर्चा ९/११ च्या वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या दुर्घटनेनंतर अधिक विस्तृत स्वरुपात झाली खरेतर भारताला दहशतवादाला गेल्या पन्नास वर्षापासुन तोंड द्यावे लागत होते. परंतु पाश्चिमात्यांनी जाणीवपुर्वक त्याकडे दुर्लक्ष केले होते. त्यामुळे दहशतवादाचा विळखा आज संपुर्ण जगाला वसला आहे. दहशतवादी जन्मतः दहशतवादी नसतो. समाज किंवा राज्यव्यवस्थेतुन तो जन्माला येतो. याची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणेः

१) अण्वस्त्रधारी राष्ट्रांशी उघड-उघड विरोध टाकण्यासाठी. २) प्रत्येक राष्ट्राला युद्ध परवडत नसल्यामुळे दहशतवादाला प्रोत्साहन. ३) देशांतर्गत अशांतता प्रस्थापित झाली असल्यास दहशतवादाला खतपाणी मिळते. ४) तंत्रज्ञान व जनसंपर्काच्या साधनामुळे दहशतवादाला अवास्तव प्रसिद्धी मिळाल्यामुळे. ५) वैफल्य, सामाजिक दुरावस्था वंचितपणाची कल्पना तसेच विकासाच्या प्रक्रियेचा आपल्याला वाटा मिळत नाही म्हणुन दहशतवाादाचा आश्रय. ६) मुलतत्ववादी व धार्मिक कट्टरतावादी आपल्या धार्मिक तत्वांचा अवलंबासाठी दहशतवादाचा आश्रय घेतात. ७) स्थानिक जनता भीतीपोटी किंवा लाभापोटी दहशतवादी संघटनांना सहकार्य करतात. उदा.नक्षलवाद. आंतरराष्ट्रीय दहशतवादाचे केंद्र विशिष्ट देशात स्थापन करुन त्याची उपकेंद्रे जगामध्ये सर्वत्र पसरलेली असुन आपल्या दहशतवादी कृत्यांमधुन संपुर्ण जगाचे लक्ष आपल्याकडे केंद्रित करण्याचा प्रयत्न या दहशतवादी संघटना करित असतात. **दहशतवादाचे प्रकार** अलीकडील २० वर्षात जगातील दहशतवादाने अतिशय विक्राळ स्वरुप धारण केलेले असुन यात आपल्याला अनेक प्रकारचा दहशतवादाची झळ प्रत्यक्ष / अप्रत्यक्षरित्या वसत आहे. त्याचे काही प्रमुख प्रकार विविध अभ्यासकांनी मांडले आहेत. अ) पॉल विल्किकन्सनच्या मते, १) पूर्णदमनकारी दहशतवाद २) क्रांतीकारी दहशतवाद ३) वैचारिक दहशतवाद ४) युद्धोन्मादित दहशतवाद ब) दहशतवादाच्या स्वरुपावरुन प्रकार, १) राष्ट्रीय दहशतवाद २) आंतरराष्ट्रीय दहशतवाद ३) सीमापार दहशतवाद.

**भारतातील दहशतवाद** भारतीय स्वातंत्र्यानंतर लगेचच नागा बंडखोराचा दहशतवाद १९८० नंतर धार्मिक दहशतवाद पुढे येऊन पंजाबात खलीस्तान लिबरेशन फोर्स, बब्बर खालसा, खालसा संघटनेचा दहशतवाद तर जम्मु काश्मिरमध्ये हिजबुल मुजाहिद्दिन लष्कर-ए-तोयबा, हरकत-उल-अन्सार, जैश-ए-मोहंमद तर १९६० च्या दशकात सुरु झालेला. नक्षलवाद आज जगातील अनेक देशात पसरलेला आहे व तो २६/११ पेक्षा वेगळा नाही. **दहशतवाद जागतिक शांततेसमोरील आव्हान** आज जगासमोर तसेच भारतासमोर ज्या महत्त्वाच्या समस्या आहेत त्यात दहशतवाद हि एक समस्या आहे. आज दहशतवादापासून जागतिक शांतता आणि सुरक्षिततेचा मोठ धोका निर्माण झाला आहे. तसा तो भारताच्या ऐक्याला आणि एकामतेलाही निर्माण झाला आहे. आज दहशतवाद कोणत्या एका

राज्यापुरता मर्यादित नाही त्याने जागतिक स्वरुप धारण केले आहे आणि त्याचा बिमोड करण्यासाठी जागतिक सहकार्याची गरज निर्माण झाली आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी, प्रधानमंत्री इंदिरा गांधी, राजीव गांधी यांचे दुःखद निधन हा या भयंकर दहशतवादाचाच पारिपाक होय. दहशतवाद हा संघटीत असतो. दहशतवादी क्रांती एका किंवा काही व्यक्तीकडे केली जात असली तरी त्यामागे एखादी संघटना कार्य करत असते. काही राज्यसुद्धा दहशतवादी मार्गाचा अवलंब करता त्यांची पद्धत उघड नसून छुपी असते, अशावेळी त्या राज्याची यंत्रणा त्या दहशतवादी कारवायात गुंतलेली असते. सीमापार दहशतवाद्यांना आर्थिक मदत, शस्त्रास्त्रांची मदत, प्रशिक्षण व आश्रय देणे इत्यादी कार्य दहशतवादाचे प्रयोजकत्व स्विकारलेले राष्ट्र करत असतात. **उपाययोजना** १) वृत्तपत्राची भूमिका खुप महत्त्वाची ठरते, त्यानी मर्यादा ओळखाव्या. उदा. २६/११ च्या हल्यातील अंतिरंजित वृत्तांकन. २) धार्मिक व आर्थिक दहशतवाद संपविण्यासाठी एकत्र समन्वय आवश्यक. ३) सरकार व नागरिकांमध्ये जागरुकता आणणे ४) दहशतवादाला राजाश्रय काढून योग्य कारवाई करणे. ५) दहशतवादासाठी नवीन कायदे आणणे. वरिल उपाययोजना बरोबर प्रत्येक जागतिक नागरिकांत सामाजिक बांधिलकी प्रमाणे व्यापक विचार करुन 'विश्वची माझे घर' या उक्ती जागुन दहशतवादाचे उच्चाटन करुन विश्वशांती स्थापनेच्या दृष्टीने एक पाऊल टाकणे गरजेचे आहे.

## सन्दर्भ ग्रन्थ

1. समकालीन जागतिक समस्या- डॉ. शैलंद्र देवळानकर 2. 21 व्या शतकातील दहशतवाद द्वितीय आवृती जानेवारी 2009-डायमंड पब्लीकेशन 3. दहशत वादाचे साधारण विवेचन-नंदकूमार रेंगे। 4. राजकिय दहशतवाद-य.दि.फडके, अक्षर प्रकाशन, मुंबई 2004।